International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# छत्रपती शिवाजी महाराजांचे हवामान विषयक धोरण

**Dr. Madhukar Vithoba Jadhav**
Assistant Professor, Department of History, Y.C.College, Halkarni, Tal-Chandgad, Dist-Kolhapur-
E-mail:- mvjhistory12@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7101651*

छत्रपती शिवाजी महाराजांचे हवामान विषयक धोरण क्रांतिकारी होते. मध्ययुगीन काळात पर्यावरणाची काळजी घेणारे छत्रपती शिवाजी महाराज एकमेव राजे होत. महाराष्ट्रातील किल्ल्यांवर निरनिराळ्या प्राण्यांचे व वनस्पतींचे वास्तव्य आहे. समुद्रातील किल्ल्यांवरील वनस्पतीचे व प्राण्यांचे आस्तित्व वेगळे, मोठ मोठी झाडे – वृक्ष व वेली हे किल्ल्याचे वेगळे वैशिष्ट्य होय. स्वराज्य वाढवत असताना त्यांनी पर्यावरण संरक्षणालाही तेवढेच महत्व दिले. मानवी जीवनाला समृध्द करणारा घटक म्हणजे निसर्ग होय. मानवी जीवनामध्ये निसर्गाला महत्वाचे स्थान आहे. एवढेच नव्हे तर निसर्ग हा मानवाच्या जगण्याचा कणा आहे. त्यामुळे मानव व निसर्ग जीवनामध्ये निसर्गाला महत्वाचे स्थान आहे. निसर्गामुळे मानवी जीवन समृध्द व आनंदी बनते. सध्याच्या आधुनिक जगामध्ये निसर्गाचा समतोल ढासळु लागला आहे. दुष्काळ, तापमान वाढ, महापूर, पावसाचे कमी होत चाललेले प्रमाण, विविध अंगी होणारे प्रदूषण या सर्वाचा परिणाम मानवी जीवनावर होताना दिसतो आहे. या सर्व समस्यामुळे मानवी जीवन जगणे अवघड बनले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी खरी गरज आहे ती छत्रपती शिवाजी महाराजांचे हवामान विषय धोरण जाणून घेऊन ते आचरणात आणण्याची.

मध्ययुगीन कालखंडामध्ये जंगलाची काळजी घेणारे छत्रपती शिवाजी महाराज एकमेव राजे होत. [१] छत्रपती शिवाजी महाराज एखादा नवीन प्रदेश जिंकून घेतल्यानंतर तेथील व्यवस्था लावत असताना तेथील रहिवाशांना अभय देऊन तेथील घरे बांधकाम व तळी खोदावयास व बागा लावावयास सांगून स्वत: मदत करीत असत. नवीन प्रदेशामध्ये झाडे लाऊन हवामान संरक्षणासाठी छत्रपती शिवाजी महाराज प्रसिध्द होते.[२] वृक्ष लावणे, वृक्ष वाचविणे व त्यांची काळजी घेणे याकडे आज कटाक्षाने लक्ष पुरविले जाते. नैसर्गिक पर्यावरणाच्या दृष्टीने त्यांचे केवढे महत्व आहे हे आपण आज जाणतो. छत्रपतींच्या काळात वृक्ष संगोपनाकडे लक्ष पुरविले गेले याचे त्याचमुळे कौतुक वाटते.[३]छत्रपती शिवाजी महाराजांनी वने निर्माण केली. वन म्हणजे केवळ उपवन नव्हे. त्यात केवळ धनी आणि त्याचे कुटुंबीय विहार करू शकतील अशी उद्यानेही नव्हेत. स्वराज्यातील वने म्हणजे रायगड व राजगड या महत्त्वाच्या दोन्ही गडाखाली मोठ्या आमराय्या होत्या. त्यावर शासनाची करडी नजर असे.[४] "झाडी प्रयत्ने वाढवावी त्यामध्ये एक काठीही तोडो न द्यावी. गडावर झाडे जी असतील ती राखावी. या विरहीत जी-जी झाडे आहेत ती फणस, चिंचा. वड, पिंपळ आदी. करून थोर वृक्ष निंबे – नारिंगे आदी करून लहान वृक्ष तसेच पुष्पवृक्ष वल्ली किंबहुना प्रयोजन अप्रयोजन जे-जे झाडे होत असेल ते गडावर लावावे व जतन करावे".[५]

गड-किल्ल्यांवर अनेक प्रकारची झाडे लाऊन त्याची चांगल्या प्रकारे जोपासना करावी यासाठी विशेष लक्ष होते. गडाच्या आजूबाजूच्या

परिसरात मोठ्या प्रमाणात अमराय्या निर्माण केल्या होत्या. छत्रपतींनी स्वराज्यामध्ये गड निर्माण करत असताना एक अतिशय महत्त्वाची खबरदारी घेतलेली होती ती म्हणजे गडावर एकच मार्ग ठेवलेला असे. जर दुसरा मार्ग असेल तर त्या रस्त्यावर विविध प्रकारची झाडे लाऊन वनराई निर्माण केलेली असे. यातून 'झाडे लावा झाडे जगवा' ही मोहीम यशस्वीपणे राबविले जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वच्छतेसंबंधी जी काळजी घेतली होती ती आज्ञापत्रामध्ये नमूद केली आहे.[६] "गडावरती मार्गामार्गावरती बाजारात तटोतट केर केसपट किमपिपडो व द्यावे ताकीद करून केर गडाखाली न टाकिता जागोजागी जाळून ती राख परसात टाकून घरोघरी होईल तेथे भाजीपाले करावे" असे स्पष्ट नमूद केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज कोणताही दुर्ग बांधण्यापूर्वी पाणी मुबलक व पुरेसे आहे कि नाही याची दक्षता घेत असत. महाराजांनी बांधलेल्या प्रत्येक गडावर जलसंचायनासाठी तलाव व पाण्याची टाकी निश्चित आहे. किल्ल्यावरील तलाव निसर्गनिर्मित नाही तर ते मानवनिर्मित आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यावरील जलव्यवस्थापन संदर्भात विशिष्ट नियम केले होते. त्या नियमानुसार जलसंचयन केले जात असे. नैसर्गिक घळीच्या तोंडाशी बांध घालून पाणी आढविले जात असे. तलाव बांधत असताना तलावाच्या चोहोबाजूंनी जलसंचायनासाठी तटबंदी मजबूत असे. महाराजांनी तलाव, विहिरी व टाके या माध्यमातून पाणी व्यवस्थापन अंमलात आणले. किल्ला सागरी असो वा डोंगरी तेथे पिण्याच्या पाण्याची सोय निश्चितच असे.[७]

शिवगंगा नदीवर बांध घालून शिवापूर येथे फळ झाडी लावलेली होती. विशेष म्हणजे तेथे समृध्द अशी आंब्यांची बाग निर्माण केली. असे अनेक बंधारे व धरणे स्वराज्यात निर्माण करून विविध फळ बागा व आमराय्या उभ्या केल्या होत्या. सार्वजनिक विहिरी बरोबरच जर कोणी सरकारी मदतीने आपल्या शेतात विहीर खणत असेल तर त्याला राजे मदत करत असत. रहाटवाड्याच्या रामजी चोरगे याला शेतात विहीर बांधायला मदत केली. इतर शेतक-यानाही या कामासाठी स्वराज्यातून मोठ्या प्रमाणात मदत केली. छत्रपतींनी खेड शिवापूर या ठिकाणी मोठे धरण बांधले.[८]

स्वराज्यामध्ये विविध प्राण्यांची जोपासना केली जात असे. भीमथडी व मानदेश इत्यादी गवताची कुरणे पाहून जागोजागी महाराजांनी गाईची खिल्लारे ठेवली होती. देशात किंवा डोंगरात चा-याच्या जागा पाहून तेथे या प्राण्यांची जपणूक केली जात असे. महाराजांनी प्राण्यांची जोपासना करण्यासाठी गवळी व इतर मंडळी ठेवलेली होती. गाईच्या खिल्लारांबरोबरच म्हशींची खिल्लारे ही चांगल्या पद्धतीने जोपासली होती. त्यांची देखभाल धनगर व गवळी करत असत. एवढेच नव्हे तर स्वराज्यामध्ये वीस ते पंचवीस हजार शेळ्या-मेंढ्यांचे कळप धनगराकडे राखणीस दिलेले होते. सर्व प्राण्यांची देखभाल योग्य पद्धतीने केली जात असे. अशा प्रकारे पाळीव प्राण्यांची सुरक्षितता स्वराज्यामध्ये योग्य पद्धतीने होत असे.[९] जंगलातील हरीण या गरीब प्राण्यांची शिकार करण्यास स्वराज्यामध्ये मज्जाव होता. स्वराज्यामध्ये तशी ताकीद दिलेली हिती म्हणजे राजांनी या वन्यप्राण्यांना सुरक्षितता दिलेली होती. जंगलातील प्राण्यांना छत्रपतींनी संरक्षण दिले होते.[१०]

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील दळवटणे येथे स्वराज्यातील सैन्याची छावणी पडली असता महाराजांनी १९ मे १६७३ रोजी त्या छावणीच्या सुभेदाराला जे

पत्र लिहिले आहे ते किती पर्यावरक पूरक आहे. याची कल्पना आपणास येईल. “पावसाळा जवळ आलेला आहे. चारा धान्य काटकसरीने वापरा चारा संपल्यावर पावसाळ्यात घोड्यांना चारा मिळणार नाही. मग घोडी तुम्हीच मारली असे होईल. धान्य संपले तर शेतक-याकडील दाणे, भाकरी, गवत, जळण व भाजीपाला आणाल. तेव्हा रयत म्हणेल की मुघलच बरे होते. उन्हाळा असल्यामुळे आगट्या चुली रंधनाळा प्रसंगी आग भडकेल आणि खणाला लागेल. त्यामुळे लाकूड मिळणार नाही. रात्रीस दिवा घरात असेल उंदीर वात नेईल आग भडकेल. ते गोष्टी न हो या करणे हमेशा फिरत जाऊन काळजी घेणे. सर्वांनी हुशार राहणे. जनावरांची आणि शेतक-यांची काळजी घ्यावी अन्यथा इज्जत वाचणार नाही”. प्राणी वाचले पाहिजेत निसर्गाला आग लागू नये. यासाठी केलेल्या सूचना आपणास पर्यावरण रक्षणासाठी योग्य व आदर्शवत ठरतात. ११

प्रत्येक किल्ल्याला नैसर्गिक तट आहे. किल्ल्याच्या संरक्षणासाठी दृष्टीने मोक्ष-मोक्ष डोंगराचेकडे तासून तट तयार केले आहेत. या तटावर झाडे लाऊन निसर्गाची जपणूक केली आहे. राजांनी निसर्गाचा समतोल आजीबात ढळू दिला नाही. गडावरील झाडी हर प्रकारे राखावी. या साठी कडक धोरणाची अंमलबजावणी केली होती. राजांनी प्रत्येक गड उभा करताना निसर्गाचा व पर्यावरणाचा अनोखा संगम साधलेला आहे. अज्ञापत्रात म्हटले आहे. “गडाची राखण म्हणजे कमरग्याची झाडी ते झाडी प्रयत्ने वाढवावी त्यामध्ये एक काठी तोडू न द्यावी बलकबुलीस त्या झाडीमध्ये हृषम बंदुकी घालाव्या कारणे जागे असो द्यावे”. छत्रपतींनी गड संवर्धनासाठी नियम केले की, “गड पाहून एकाहून अधिक दरवाजे आणि चोरदिंड्या ठेवाव्यात. पैकी गरजेच्या तेवढ्या मोकळया ठेवून बाकी चिणून टाकाव्यात.[१२] वेळप्रसंगी मोकळया करून वापरता येईल. गडास आत जायचे मार्ग सुगम नसावेत. असले तरी ते मोडून त्यावर झाडी वाढवून ते दुर्गम करावेत”. हवामानातील बदलामुळे जीवसृष्टीतही बदल होतात. यासाठी महाराज म्हणतात “या वृक्षाच्या अभावे हानीही होते”.[१३]

छत्रपतींनी पर्यावरण संवर्धनासाठी घनदाट अरण्ये वाढविली. त्याचबरोबर शस्त्र बरोबर लढण्यासाठी या घनदाट अरण्याचा राजांनी उपयोग केला. इ. स. १६६१ मध्ये कारतबखानाच्या नेतृत्वाखालील मोगल सैन्याला मराठ्यांनी घनदाट अरण्य असलेल्या उंबरखिंडीत गाठले. छत्रपतींनी घनदाट अरण्याच्या मदतीने मोगल सेनेचा पराभव केला. छत्रपतींनी घनदाट अरण्याचा उपयोग युध्द प्रसंगी केलेला आढळतो. वनदुर्गाप्रमाणे स्वराज्यातील वनराय्या युध्द प्रसंगी उपयुक्त ठरल्या.[१४]

गडावरील झाडी हर प्रयत्ने करून राखावी अशी छत्रपतींची सक्त ताकीद होती. या झाडांचा उपयोग हवामान रक्षणाबरोबरच वेळ प्रसंगी पडकोटाप्रमाणे उपयोग होतो हे विसरू नये. दारूची कोठारे मुख्य इमारतीपासून दूर अंतरावर बांधावीत जेणे करून कोणतेही नुकसान होणार नाही.[१५] “छत्रपतींनी स्वराज्यामध्ये बागायती शेती व अमराय्यावाडीकडे वारोवांर लक्ष दिले. [१६] छत्रपतींनी डोंगर किल्ल्यांवर झाडांचे नैसर्गिक तट निर्माण करून वृक्षांच्या रांगा निर्माण केल्या. सह्याद्रीच्या अनेक गड-किल्ल्यांवर अशा अनेक वनराय्या निर्माण केल्या.[१७]

गडाभोवतीच्या जंगलात आरमाराच्या दृष्टीने उपयोगितेचे सागवान जपणारे छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजे होते. आजही

आपणास गड किल्ल्यांच्या आजूबाजूनी उतारावर छत्रपतींनी निर्माण केलेली जंगले पहावयास मिळतात. थोर मानवतावादी, आदर्शवादी, सहिष्णुतावादी अशी चौफेर भूमिका बजावताना हवामान रक्षणासाठीही त्यांनी महत्वपूर्ण पावले उचलली. त्यांची ही भूमिका त्यांनी आपल्या सैन्याला दिलेल्या सुचने वरून दिसून येते.[१८] छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार लढाऊ जहाजांची निर्मिती करतानाही त्यांनी वृक्षसंवर्धनाकडे काळजीपूर्वक लक्ष दिले होते. वृक्ष रक्षणाचे आवाहन जनतेला व स्वराज्यातील अधिकारी वर्गाला केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले बांधणीचे तंत्र व किल्ल्यांचे नियोजन आणि व्यवस्थापन आदी. बाबींचा सखोल अभ्यास केला तर त्यातूनही त्यांचा हवामान दृष्टीकोन दिसून येतो.[१९]

स्वराज्य वाढवत असताना छत्रपतींनी पर्यावरण संरक्षणाला खूप महत्व दिले. या संदर्भात कास्म-दी-गार्दा सांगतो 'छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रदेश जिंकल्यानंतर प्रथम तेथील रहिवाशी नागरिकांना अभय देत असत. नंतर घरे बांधकामास, तळी खोदावयास व बागा लावावयास सांगून स्वत: जातीने मदत करीत असत.[२०] मध्ययुगीन कालखंडात वृक्ष संगोपनास प्रोत्साहन देऊन नव-नवीन प्रदेशात वृक्षलागवडीची गरज छत्रपती शिवाजी महाराजांनी जाणली होती. यातच त्याचे सर्वश्रेष्ठत्व सामावलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात गड-किल्ल्यांवर शौचकुपांची व्यवस्था अतिशय उत्तम अशी केलेली होती. हवामानाचा समतोल राखण्यासाठी छत्रपतींनी योग्य ती काळजी घेतली होती. छत्रपतींनी निर्माण केलेल्या प्रत्येक गड-किल्ल्यांवर शौचकुपाची व्यवस्था आहे. आज आपणास रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, पुरंदर, राजगड, विजयदुर्ग या किल्ल्यांवरती शौचकुपाची व्यवस्था पाहता येते.[२१] छत्रपतींनी स्वराज्यातील पडीक जमिनीवरती मोठ्या प्रमाणात वनराय्या निर्माण केल्या. त्याच बरोबर गड-किल्ल्यावर व गड-किल्ल्यांच्या परिसरामध्ये विविध जातीची झाडे लावली व त्याचे संवर्धन काळजीपूर्वक केले. आंबा, चिंच, फणस, पिंपळ, आवळा, चिकू, नारळ, वड, बाभूळ, नारळ, सुपारी यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली होती. महाराजांचे वेगळेपण म्हणजे महाराज एका गडावरून दुस-या गडावर संदेश पाठविण्यासाठी संदेश वाहक म्हणून धुराचा वापर करीत असत. अशा काळ्या व पांढ-या धुरासाठी त्यांनी वेगवेगळया जातींच्या झाडांची लागवड स्वराज्यात केली.[२२]

गड-किल्ल्यावरील वस्तीमध्ये किंवा गडावर कोठेही कचरा साठला तर तो जाळून त्याची राख जमिनीवर टाकून त्यावर भाज्या पिकवण्यात याव्यात. गड-किल्ले नेहमी स्वच्छ ठेवावेत, पाणसाठे, विहिरी कायम स्वच्छ राहावेत. सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावावी. शोषखड्ड्यांची व्यवस्था कंपोस्ट खतासाठी सोनखतासाठी सदैव आग्रही दृष्टीकोन पाहता छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वच्छताविषयक प्रगत दृष्टीकोन दिसून येतो.[२३] किल्ले रायगड, राजगड, सिंहगड, पन्हाळा आदी. किल्ल्यांवर बागबगीचा केला होता. विविध फळे व फुले यांच्या बागा लावल्या होत्या.[२४]

छत्रपतींचे गड-किल्ले म्हणजे जैवविविधतेचा खजिना आहे. महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांच्या सानिध्यात वेगवेगळया प्राण्यांचे व विविध वनस्पतींचे अस्तित्व आहे. जसे गिरीदुर्गावरील प्राणी, पक्षी, वृक्ष वेगळे तसेच

समुद्रातील गड-किल्ल्यांवरील प्राणी-वनस्पती वेगळे आंबा, फणस, बेहडा, पळस, वारस, बहावा, पांगारा, बिजानाणा, शिवण, नारळ, सुपारी, वड, पिंपळ, उंबर, अंजन, कौशी, करमळ याबरोबरच विविध वृक्ष-वेली मोठ्या प्रमाणात आढळताना दिसतात. किल्ल्याच्या सौदर्यात भर घालणारी कारविची फुले मोठ्या प्रमाणात दिसतात. किल्ल्यांवरील सडे अतिशय मनमोहक असतात. जांभ्या दगडाचे असणारे हे सडे गुलाबी, जांभळया, पिवळया, पांढ-या रंगाचे हे सडे फुलून येतात.[२५] गड-किल्ल्यांच्या कड्या कपारीत तट – बुरुजांवर विविध प्राणी आश्रयाला राहतात. अनेक जाती-प्रजाती गड-किल्ल्यांवर सुखरूप जगताना दिसतात. आज पर्यावरण संवर्धन करताना गड-किल्ल्यांवरील हा निसर्गाचा ठेवा जोपासला पाहिजे. औषधि वनस्पतीची लागवड करून त्यांच्या संवर्धनाची व्यवस्था केली होती. छत्रपतींनी कोणत्याही जंगलात आग लागू नये म्हणून वनरक्षकांच्या नेमणुका केल्या होत्या.[२६]

अमात्याच्या आज्ञापत्रामध्ये म्हटले आहे ते असे 'जीवजंतू न राही ते करावे गडावरी मार्गावरी बाजारात तटोतट केरकसपट अजिबात पडो न द्यावे. केर गडाखाली न टाकता जागोजागी जाळून ती राख ही परसात टाकून घरोघरी होईल ते बाजीपाले करावे. गड, रस्ता, बाजारपेठ आदी. ठिकाणी स्वच्छतेबाबत छत्रपती शिवाजी महाराज किती दक्ष होते हे आपल्या लक्षात येते.[२७] अॅबे कॅरे या संदर्भात म्हणतो. 'छत्रपती शिवाजी महाराजांना देशातील भूगोलाचा विशेष अभ्यास आहे. देशातील सर्व शहरांची इतकेच नव्हे तर भूप्रदेशाची आणि वनस्पतींची त्यांना माहिती आहे'.[२८]

छत्रपती शिवाजी महाराजांचे हवामान विषयक धोरण क्रांतिकारी होते. गडावर आमराय्या निर्माण करणारे व जंगलात आरमारायाच्या दृष्टीने उपयोगी असणारे सागवान जोपासणारे छत्रपती शिवाजी महाराज हे एकमेव राजे होत. १७ व्या शतकात छत्रपतींनी गड-किल्ल्यांच्या उतारावर जोपासलेले जंगल पाहताना आश्चर्य झाल्या शिवाय राहत नाही. छत्रपती शिवाजी महाराज पर्यावरणाचे प्रणेते होत. पर्यावरण संरक्षणासाठी त्यांनी घेतलेले निर्णय व केलेली कृती आजच्या पार्श्वभूमीवर अभ्यासनीय अशीच आहे. छत्रपतींच्या जलव्यवस्थापन, कृषीजीवन, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता निवारण, वृक्ष संवर्धन, वनसंवर्धन, झाडे लावा झाडे जगवा या बाबतचा त्यांचा दृष्टीकोन आजही आपणासाठी उपयुक्त आहे. छत्रपतींची ही शिकवण घेऊन आपण त्यांच्या वाटेने मार्गस्थ झालो तर आपल्याला निसर्गाने दिलेल्या जैवविविधतेचे संरक्षण नक्की करता येईल.

संदर्भ सूची :

1. रोडे सोमनाथ, इतिहास संशोधन पत्रिका, धुळे, २००९, पृष्ठ १००.
2. हरदास बाळशास्त्री, पुण्यश्लोक छ.शिवाजी महाराज, पुणे, १९७६, पृष्ठ ६४.
3. खोले विलास (संपा), आज्ञापत्र, २००७, मुंबई, पृष्ठ ३७.
4. पवार जयसिंगराव (संपा), छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, २०११, पृष्ठ १३२.
5. खोले विलास (संपा), आज्ञापत्र, २००७, मुंबई, पृष्ठ ८३.
6. आंबेडकर रामनाथ (संपा), किल्ला, मुंबई, २०१४, पृष्ठ ५२.

7. दै. महाराष्ट्र टाईम्स, २० नोव्हेंबर, २००४.
8. केळुसकर, कृ.अ,छ. शिवाजी महाराज, पुणे, १९८९, पृष्ठ ४४७.
9. कित्ता, पृष्ठ ४४४ व ४४५.
10. कुलकर्णी भिमराव, श्री.शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, पुणे, १९६७, पृष्ठ ८९.
11. मगदूम भिकाजी, मावळयांनो शिवराज्य संपविले जात आहे, इस्लामपूर, पृष्ठ ६८.
12. कुलकर्णी अ. रा. व खरे ग. ह,मराठ्यांचा इतिहास-खंड पहिला, पुणे,१९८४,पृष्ठ २९६ व २९७.
13. खोले विलास (संपा), आज्ञापत्र, २००७, मुंबई, पृष्ठ ८८.
14. कुलकर्णी अ.रा.व खरे ग.ह,मराठ्यांचा इतिहास-खंड पहिला, पुणे, १९८४, पुष्ठ ३३१.
15. कित्ता, पुष्ठ ३३०.
16. घोरपडे आनंद, शिवछत्रपती समज –असमज, पुणे, २००१, पृष्ठ ४४.
17. हनवते प्रेम, शिवरायाचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक, कोल्हापूर, १९९४, पृष्ठ २४.
18. अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, (संपा), विलास खोले, पुणे, २००७, पृष्ठ ८८.
19. बाळशास्त्र हरदास, पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, १९७६, पृष्ठ ६४.
20. आमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, (संपा), राव. व दि. पुणे, पृष्ठ ३७.
21. खोले विलास (संपा), आज्ञापत्र, २००७, मुंबई, पृष्ठ ८२.
22. आंबेकर रामनाथ, किल्ला, मुंबई, २०१४, पृष्ठ १०६ ते ११३.
23. दै. पुण्यनगरी, दि. २६ फेब्रुवारी, २०१६.
24. कुलकर्णी अ.रा.खरे, ग. ह, मराठ्यांचा इतिहास, पुणे, २००६, पृष्ठ ३०१.
25. जगताप पी.एस,रयतेचा राजा शिवछत्रपती, कोल्हापूर, २०१६, पृष्ठ १७३.
26. खोले विलास (संपा), आज्ञापत्र, २००७, मुंबई, ८२.
27. पोतदार द. वा, शिवचरित्राचे पैलू, पुणे, १९८०, पृष्ठ १२०.
28. पोतदार द. वा, शिवचरित्राचे पैलू, पुणे, १९८०, पृष्ठ १२०.